**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** पूराडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0006 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/01/2025 23:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 24/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/01/2025
**Time From (वेळेपासून):** 12:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/01/2025 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/01/2025 23:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.400 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कुरखेडा ते कोरची रोड ,वनपरिक्षेत्र अधी कार्यालय जवळ, मौजा पुराडा,कुरखेडा, 441209

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आशिष प्यारेलाल अग्रवाल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोरची ,कोरची,कोरची,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोरची ,कोरची,कोरची,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** दुकानदार

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9577664499

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नरेंद्र सिताराम तोकलवार | | | 1. पुराडा ,कुरखेडा,पूराडा, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-441209 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | रेडमी 9 पावर कपनीचा 01 नग मोबाईल | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ रू. रोख रक्कम | 20,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | एक जुना वापरता निळया रंगाचा लोअरपन्ट 01 नग | 0.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | 4) सन्डीक्स कंपनीचा मेमोरी कार्ड 01 नग | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
पोलीस स्टेशन पुराडा
दिनांक 24/01/2025
नांव:-श्री. आशिष प्यारेलाल अग्रवाल, वय 40 वर्षे, धंदा-मेडीकल दुकाण, मु. कोरची ता. कोरची जि.गडचिरोली.
मो.नं. 7757005944, 9577664499

मी दिनांक 22/01/2025 रोजी सायंकाळी 19.29 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री.चंद्रशेखर ढोले साहेब यांना त्यांचे मोबाईलवर फोन करून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संदर्भात तक्रार असल्याबाबत माहिती दिली असता, श्री.चंद्रशेखर ढोले साहेबाने उदया दिनांक 23/01/2025 रोजी दुपारी 01.00 वा. च्या दरम्यान पुराडा गावालगत रोडच्या कडेला हजर राहा, मी पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब, पंच, स्टाफसह तुम्हाला भेटण्यास सांगतो. म्हणुन मी दिनांक 23/01/2025 रोजी 12.30 वाजता दरम्यान पुराडा गावालगत रोडच्या कडेला माझे मारूती सुझुकी इर्टीगा वाहन क्र. एमएच 33 डब्ल्यु 4499 ने हजर होवुन पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब यांना त्यांचा संपर्क क्रमांक घेवुन फोन केला. थोडयाच वेळात लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड हे शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने पुराडा गावाच्या रोडच्या कडेला 12.50 वा. पोहचले. त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने माझी लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प पुराडा येथे दिनांक 23/01/2025 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर राहत असून वरील प्रमाणे काम करतो. माझे नावे ट्रक्टर क्र.एमएच 33 एफ 1737 असुन त्या ट्रक्टरवर रोजनदारीने मी मौजा मोहगांव ता. कोरची येथील श्री.मितीलेश खोबा यांना चालक म्हणुन कामावर ठेवले आहे. त्या ट्रक्टरने मी परिसरातील बांधकामावर मटेरीयल पुरवठा करण्याचे कामे करीत असतो.

दिनांक 22/01/2025 रोजी मी गडचिरोली येथे कामानिमीत्य असतांना माझे ट्रक्टर वरील चालक श्री. मितीलेश खोबा हा माझे ट्रक्टरने मौजा मोहगांव येथील घरकुल लाभार्थी श्री.देशराम प्रीतराम खोबा रा. मोहगांव ता.कोरची जि. गडचिरोली यांचे घरकुल बांधकामासाठी लागणारी रेती शासकीय परवानासह मौजा नाळेकल ता. कोरची येथील नाल्यातुन ट्रक्टरमध्ये वाहतुक करीत असतांना, मौजा नाळेकल गावाचे रोडवर उपक्षेत्र कोहका येथील श्री. तोकलवार, वनपाल साहेब यांनी ट्रक्टर थांबवुन,"तु कोणाला विचारून रेती घेवुन जात आहे, तुझी ट्रक्टर जप्त करून कार्यालयात लावतो असे म्हणुन तुझा मालक कोण आहे, त्याला फोन लाव, नाहीतर तुझी ट्रक्टर जप्त करून कारवाई करतो" असे म्हणाला, तेव्हा माझे चालक मितीलेश खोबा यांने त्याचे मोबाईल क्र. 7588749384 वरून दुपारी 03.15 वा. दरम्यान मला फोन करून वरील घटनेबाबत माहिती देवुन त्याने मला श्री. तोकलवार, वनपाल साहेब यांचे सोबत बोलणी करा असे बोलुन, मितलेष खोबा याने त्याचे फोन श्री. तोकलवार, वनपाल साहेब यांचेकडे दिला. तेव्हा श्री. तोकलवार, वनपाल साहेब यांनी मला "तुमचे ट्रक्टरने, विना परवाना वनविभागाचे हददीतुन अवैध्य

उत्खनन करुन रेती नेत आहे, त्याचेवर कारवाई करतो, नाहीतर तुम्ही 25,000 रू. घेवुन उदया, पुराडा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय येथे भेटा, आता तुमची ट्रक्टर सोडतो.'' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना विनंती केली की, माझा ट्रक्टरचा चालक हा घरकुल बांधकामा करीता शासकीय परवाना असलेली रेती नेत आहेत, ट्रक्टर सोडुन दया मी तुम्हाला उदया येवुन पुराडा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय येथे भेटतो, असे म्हणालो असता, श्री. तोकलवार साहेबांनी ''ठिक आहे, पैसे घेवुनच कार्यालयातच येवुन भेट'' असे म्हणुन पैशाची मागणी केली.

त्याप्रमाणे दिनांक 23/01/2025 रोजी सकाळी 12.30 वाजता पुराडा वनपरिक्षेत्र कार्यालय येथे श्री. तोकलवार साहेब यांना भेटण्याकरीता गेलो असता ते कार्यालयात व निवासस्थानी हजर मिळुन न आल्याने मी त्याचे मोबाईल क्र.9403926016 वर फोन लावुन विचारणा केली असता, श्री. तोकलवार साहेब यांनी '' मी कामा निमीत्य बाहेर आलो आहे, तु उदया दिनांक 24.01.2025 रोजी दुपारी 12.30 वाजता दरम्यान 25,000 रू. सोबत घेवुन वन परिक्षेत्र कार्यालय पुराडा येथे येवुन भेट असे बोलुन मला पैशाची मागणी केली.

श्री. तोकलवार, वनपाल, उपक्षेत्र कोहका, वन परिक्षेत्रा अधिकारी कार्यालय पुराडा यांनी दिनांक 22/01/2025 रोजी घरकुला करीता रेती घेवुन जात असलेले ट्रक्टर पकडुन त्याचेवर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन 25,000/- रू लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री. तोकलवार, वनपाल, उपक्षेत्र कोहका यांना 25,000/- रू.लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. 25,000/-सोबत घेऊन आपले कार्यालया मार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प पुराडा येथे तक्रार देत आहे.

श्री. तोकलवार, वनपाल, उपक्षेत्र कोहका यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 25,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत व माझे ट्रक्टरचे कागदपत्र व रेती रायल्टी पावती सोबत देत आहे.

त्यानंतर श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री. शिवाजी राठोड यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. तसेच मी देखील त्यांना लिहुन दिलेली तक्रार कथन केल्यानंतर सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांचेकडे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी माझे वैयक्तीक बचतीमधिल आणलेली लाच रक्कम रू. 25,000/- (रू. 500/- दराच्या 50 चलनी नोटा) हजर केले. त्यावेळी त्यांनी सदर नोटचे क्रमांक पंचासमक्ष नोंदवुन घेतले. त्यानंतर सदर नोटावर अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाई पथकातील पोलीस हवालदार श्री. डांगे यांनी सदर पावडरचे गुणधर्म सांगुन सदर पावडर कश्या प्रकारे प्रकाशात व अंधारात काम करते याचे प्रात्यक्षिक दाखवले. तद्नंतर मी त्यांचेकडे कारवाई कामी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. सदर पावडर लावलेली रक्कम एका खाकी रंगाचे कागदी लिफाफयात सुरक्षित ठेवुन पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब यांनी स्वताचे ताब्यात ठेवली. त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी त्यांचे कडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. मला श्री. तोकलवार साहेबांनी उदया दिनांक 24/01/2025 रोजी दुपारी 12.30 वा. च्या सुमारास 25,000 रुपये घेवुन वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय,पुराडा येथे कार्यालयात बोलावलेले असल्याने व ते आज रोजी हजर नसल्याने मला पुन्हा स्वताहुन त्यांचेशी कोणताही संपर्क न साधन्याची सुचना देवुन पुन्हा मला दिनांक 24/01/2025 रोजी पुराडा गावचे अलिकडे 1 किमी अंतरावर सकाळी 12.00 वा. च्या सुमारास सापळा कारवाई पुढे सुरु करण्यासाठी येण्याचे कळवुन पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब यांनी दिनांक 23/01/2025 रोजीची कार्यवाही स्थगीत केली.

आज दिनांक 24/01/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी सांगीतल्या प्रमाणे मौजा पुराडा गावाचे लगत हजर राहण्याबाबत सांगीतल्याप्रमाणे मी त्याठिकाणी हजर आलो असता, तेथे श्री शिवाजी राठोड, शासकीय पंच व स्टाफ शासकीय वाहन क्र. एमएच 12 पीक्यु 3689 सह हजर होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन वेळ 12.55 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतमधील बनियानला लटकवून

ठेवून मला पंच क्रं. 1 श्री. गोपाल भेंडारे यांचेसह वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा येथे माझे मारूती सुझुकी इर्टीगा वाहन क्र. एमएच 33 डब्ल्यु 4499 रवाना झालो.

तेव्हा गैरअर्जदार श्री. तोकलवार साहेब, वनपाल हे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा यांचे कार्यालयात चे बाहेर जावुन फोन केले असता, ते कार्यालयाचे बाहेर येवुन मला भेटले, तेव्हा त्यांनी मला नमुद कामासंबधाने बोलणी करून, ''ऐसा करो पच्चीस दे दो'' तेव्हा मी श्री. तोकलवार साहेब यांना ''पच्चीस हजार ज्यादा नही होंगे सर ?'' असे बोललो असता,त्यांनी ''बिस दे दो फिर'' असे बोलता, मी त्यांना ''विस हजार न'' असे बोललो असा, त्यानी 'ह..' म्हणुन होकार दर्शवुन लाच रक्कम 20,000 रू.स्विकारण्याचे मान्य करून, यापुढे सुरळीतपणे रेती वाहतुकीकरीता ट्रक्टर चालविण्याचे कामाकरीता लाच रकमेची मागणी संदर्भात बोलणी केल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी व पंच क्र.1 सह नियोजित ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 13.44 वाजता बंद करण्यात आला. नंतर माझी सविस्तर अंगझडती घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. षिवाजी राठोड साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. तोकलवार, वनपाल, उपक्षेत्र कोहका, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा यांनी मला माझे ट्रक्टरने घरकुला करीता रॉयल्टीची रेती घेवुन जात असतांना ट्रक्टर पकडुन त्याचेवर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला व पुढे सुरळीत पणे टॅक्टर चालु देण्याचे कामा करीता 25,000/- रू लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती 20,000/- रू लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री करून त्यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन श्री. तोकलवार, वनपाल उपक्षेत्र कोहका यांनी तडजोडी अंती 20,000/- रूपयाची मागणी करुन ते स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने मला पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब यांनी मी त्यांचेकडे लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई कामी हजर केलेले व पंचासमक्ष अँथ्रॉसिन पावडर लावलेली बंद खाकी रंगाचे कागदी पाकीटात ठेवलेले 25,000/- रूपयाचे पाकीट पोलीस हवालदार श्री. डांगे यांचेकरवी सदर पाकीटातुन 25,000 रुपये रकमेपैकी 5,000/- रू. लाचेची रक्कम काढुन त्यावरील अँन्थ्रासीन पावडर स्वच्छ पुसुन सदर नोटांवर पावडर नसल्याची खात्री करुन मला परत देवुन लेखी पावती दिली व सदर 5000/- रू. मी माझे जिन्सपॅन्टचे मागील उजव्या बाजुचे खिश्यात ठेवले. तसेच अँन्थ्रासीन पावडर लावलेले लाच रकमेकरीता हजर केलेली उर्वरीत 20,000/- रुपये रकमेच्या 500 रुपयांच्या 40 नोटा पोहवा श्री. डांगे यांनी माझे जिन्स पॅन्टचे पुढिल बाजुचे डावे डावे खिशात घडी करून अलगद ठेवली असता मला पोलीस निरीक्षक श्री. राठोड साहेब यांनी सदर रक्कम हि गैरअर्जदार यांनी मागणी केल्याशिवाय काढुन देवु नये अशी सुचना दिली. सदर वेळी सापळा पथकातील लाच रकमेस अँन्थ्रासीन पावडर लावलेले पोहवा श्री. डांगे यांना कारवाई पथकातुन वगळण्यात येवुन सापळा पार्टीतील सर्व सदस्य, पंच, व आमचे हातास अँन्थ्रासीन पावडर लागले नसले बाबत खात्री करण्यात आली. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन सापळा पथकातील सर्व सदस्यांना त्यांनी सापळा ठिकाणी थांबावयाच्या जागा निश्चित करवुन देवुन श्री. तोक श्री. तोकलवार, वनपाल यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा चे बाहेर दर्शनी भागी येवून मी माझे चेह-यावर लावलेला चष्मा काढुन लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड साहेब यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर 14.17 वाजता सुरू करून माझे शर्टाचे आतमधील बनियानला लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे मारुती सुझूकी अर्टीगा वाहनाने वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा येथे गैरअर्जदाराकडे पैसे देण्याकरीता रवाना झालोत. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य माझे मागोमाग आले. मी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा येथे जावुन, श्री. तोकलवार, वनपाल उपक्षेत्र कोहका यांना त्यांचे मोबाईलवर कार्यालयाचे समोरील ढाब्याजवळ जावुन फोन केले असता, ते वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयचे जवळील ढाब्याजवळ आले व त्यांनी उजव्या हाताचे इशा-याने पैसे आणले का, असा इशारा केला असता, त्यांना मी अँथ्रॅसिन पावडर लावलेले रू. 20,000/- लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यातुन डाव्या हाताने काढून श्री. तोकलवार, वनपाल उपक्षेत्र कोहका यांना दिले असता, त्यांनी उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हातानें नोटा मोजुन लाच रक्कम त्यांनी परीधान केलेल्या लोअर पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर मी श्री. तोकलवार साहेब यांना, ''अब मेरे तरफ ध्यान रखना'' असे म्हणालो असता, त्यांनी मला ''लेकीन जो मैने बताया, वैसे करणा, मेरा नंबर उसको दे दो, वो कभी भी

फोन कर सकता हे मेरेको" असे बोलल्याने मी त्यांना "अब थोडासा तकलीफ ना हो" असे बोलुन त्याठिकाणाहुन दर्शनी भागी येऊन सापळा पथकास दिसेल अश्या रितीने चेह-यावरील चश्मा काढुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकातील स्टाफने श्री. तोकलवार, वनपाल उपक्षेत्र कोहका यांना जागीच पकडुन पुढील कारवाई केली. पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 14.27 वाजता बंद केले व नंतर माझी अंगझडती घेण्यात आली. लाच रक्कम 20,000/- रू., रेडमी 9 पावर कंपनीचा 01 नग मोबाईल व एक जुना वापरता निळ्या रंगाचा लोअरपॅन्ट एक नग हे श्री. तोकलवार, वनपाल उपक्षेत्र कोहका यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील मेमोरी कार्ड पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी प्रात्याक्षीक, पडताळणी व सापळा पंचनाम्यात घेतले आहेत.

तरी श्री.नरेंद्र सिताराम तोकलवार,वय 57 वर्ष, पद- वनपाल, उपक्षेत्र कोहका, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुराडा यांनी दिनांक 22/01/2025 रोजी माझे नावे असलेले ट्रक्टर क्र.एमएच 33 एफ 1737 याने घरकुला करीता रॉयल्टीची रेती घेवुन जात असतांना ती ट्रक्टर पकडुन त्यावर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला व पुढे सुरळीत पणे टॅक्टर चालु देण्याचे कामा करीता पंचासमक्ष 25,000/- रू लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळून आल्याने त्यांच्याविरूद्ध माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( शिवाजी राठोड ) (आशिष प्यारेलाल अग्रवाल)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

bhushan sambhaji pawar(I (Inspector)) / dgpbspm8504 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रभारी अधिकारी
पोलीस स्टेशन परांडा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** bhushan sambhaji p
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** dgpbspm8504

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)